# ज्योती

जानेवारी २०२१

संकेतस्थळ: www.neomm.org


ईशान्य ओहायो
मराठी मंडळ

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

कसे आहात सगळे? २०२१ चा पहिला ज्योती अंक तुमच्या समोर सादर करतांना मला अमाप आनंद होतोय. २०२० बरंच शिकवून गेलाय. शहाणं करून गेलाय. चला तर मग नव्या उमेदीने आणि उत्साहाने २०२१ चा स्वागत आणि सुरुवात करूया. ज्योत तेवत ठेऊया.

या संधी साठी NEOMM ला धन्यवाद आणि ज्या सदस्यांनी या पहिल्या ज्योती मध्ये सहभाग घेतलाय त्यांनाही मनापासून धन्यवाद.

- **स्नेहिता**

या अंकात ....

- संक्रांत वारली पेन्टिंग (रुपाली रडे)
- अध्यक्षीय (संदीप दीक्षित)
- २०२१ NEOMM कार्यकारिणी
- संक्रांत चित्रकला (नेहा कुलकर्णी)
- मकरसंक्रांत लेख (आनंद मोरे)
- तिळाचे लाडू पाककृती (इला कुलकर्णी)
- स्वैयंपाक घरातील नुस्के (गौरी कुलकर्णी)
- विंटर RV ट्रिप अनुभव (हर्षल बरीदे)
- सांख्य कारिका लेख (संदीप दीक्षित)
- ओरिगामी घर (इला कुलकर्णी)
- वारली चित्र / हिम मानव (snowman) (जितेश रडे)

# अध्यक्षीय



नमस्कार मित्रांनो,

मी संदीप दीक्षित, आपल्या छोट्याश्या पण घट्ट अशा क्लिव्हलँड मराठी कुटुंबाचा १९९४ पासूनचा एक सदस्य! सर्वात प्रथम NEOMM (नॉर्थईस्ट ओहायो मराठी मंडळ ) २०२१ च्या अध्यक्षपदी तुम्ही सर्वांनी माझी निवड केलीत त्याबद्दल मन:पूर्वक आभार. मी व माझे सर्व सहकारी आपल्या सर्वांसाठी जोमाने काम करायला एकदम सुसज्ज आहोत. या २०२१ च्या पहिल्या ज्योतीच्या अंकात मी माझ्या सर्व सहकाऱ्यांची ओळख व प्रत्येकाच्या कामाची थोडीशी माहिती करून देत आहे. कुठलाही प्रश्न किंवा सूचना असतील तर मला अगदी नि:संकोचपणे सांगा.

गेले वर्ष हे कोव्हीड चे वर्ष. कोव्हीडने क्लिव्हलँडच नाही तर नॉर्थ अमेरिकेतील सर्व communities पुढे, सर्व मंडळांपुढे एक मोठी समस्या उभी केली. अशा कठीण काळात २०२० चे अध्यक्ष शेखर गणोरे व त्याच्या सहकाऱ्यांनी ज्या जोमाने काम केले व मंडळाची धुरा सांभाळली त्याबद्दल पण मी त्यांचे मनापासून कौतुक व आभार व्यक्त करतो. कोव्हीडच्या काळात सर्व देशभर झूम हेच आता प्रोग्रॅमिंग चे चॅनेल बनले आहे. आता जरी vaccine तयार झाले असले तरी आपल्या सर्वांपर्यन्त पोहचायला अजून थोडा अवधी आहे. तेंव्हा आम्ही आखलेल्या वर्षभरातल्या १० हुन अधिक कार्यक्रमामधले पहिले ३-४ कार्यक्रम झूम वरच होतील. पण जोरदार होतील हे नक्की.

आपल्या सर्वांचा सहभाग हा सगळ्यात महत्वाचा! आपण जस भारतात लग्नकार्यास जातो, भाग घेतो त्याच भावनेने सर्वांनी प्रत्येक समारंभाला यायला तर पाहिजेच पण भाग सुद्धा घेतला पाहिजे बर का!

चला तर मग नवीन वर्षांची गोड सुरवात करूयात संक्रांतीच्या कार्यक्रमाने! तिळगुळ घ्या आणि गोड बोला!

संदीप दीक्षित<br>
अध्यक्ष NEOMM २०२१<br>
७ जानेवारी, २०२१

## २०२१ ईशान्य ओहायो मराठी मंडळ परिवार

### NEOMM २०२१ कार्यकारी समिती



संदीप दीक्षित
अध्यक्ष



हर्षद कुलकर्णी
उपाध्यक्ष



हर्षल बरीदे
कोषाध्यक्ष



संध्या देशपांडे
चिटणीस



स्नेहिता बरीदे
ज्योती संपादक

### NEOMM २०२१ विश्वस्त



डॉ जगदीश मुडे



संध्या क. देशपांडे



तन्मयी दीक्षित

## २०२१ ईशान्य ओहायो मराठी मंडळ परिवार

### सांस्कृतिक कार्यक्रम



गीता लिमये
गट प्रमुख



तन्मयी दीक्षित



प्रेरणा वर्मा



पल्लवी चव्हाण



तृप्ती जातेगांवकर

### सांस्कृतिक कार्यक्रम



योगेश जातेगावकर




श्रीरंग दातार

### उपहार समिती



अमृत पल्की
गट प्रमुख




अपूर्वा
चिटणीस




अभिजीत कुरणे



दीप्ती गणोरे

### युवक कार्यक्रम समिती



विवेक विन्हेकर
गट प्रमुख



विश्वेशा देशपांडे



शिल्पा
कांकरिया


### संपर्क आणि सदस्यत्व



संध्या देशपांडे
गट प्रमुख



रितू चक्करवार




चंद्रा
खाडिलकर

## २०२१ ईशान्य ओहायो मराठी मंडळ परिवार

### संपर्क

Not Pictured

मेधा गोडबोले
गट प्रमुख



संध्या क. देशपांडे



स्वाती साठे

### संपर्कस्थळ तंत्रज्ञ



अश्विन मालगावकर
गट प्रमुख

### निधी संचयन



क्षितिजा भोरकर
गट प्रमुख

### Jyoti Editing Committee



स्नेहिता बरीदे
गट प्रमुख



आनंद मोरे



इला कुलकर्णी

### छायाचित्रण , झूम प्रक्षेपण मदत

Not Pictured

केदार चव्हाण
गट प्रमुख

### अर्थ व्यवस्था



हर्षल बरीदे गट प्रमुख

### आज्ञा कक्ष समिती



हर्षद कुलकर्णी गट प्रमुख



संदीप दीक्षित



प्रिया भट

**आपल्या सर्वांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा - NEOMM स्थानिक कलाकार - नेहा कुलकर्णी**




**मदत पाहिजे**

ईशान्य ओहायो मराठी मंडळाच्या खाद्य समितीला २ कार्यकर्त्यांची गरज आहे. इच्छुकांनी हर्षद कुलकर्णी यांच्याशी (216) 798-2757 या क्रमांका वर संपर्क साधावा.

# मकरसंक्रांत

'मकर' हा शब्द मकर राशीशी संबंधित आहे, तर 'संक्रांत' याचा अर्थ संक्रमण असा आहे. सूर्य मकर राशीत प्रवेश करत असल्याने या दिवसास 'मकरसंक्रांत' किंवा फक्त ‘संक्रांत’ असे म्हणतात. हिंदू महिन्यानुसार, मकरसंक्रांत सण पौष शुक्ल पक्षामध्ये साजरा केला जातो. इंग्लिश महिन्यानुसार मकरसंक्रांत बहुधा १४ जानेवारी रोजी येते.

संक्रांतीच्या आधीचा दिवस महाराष्ट्रात ‘भोगी’ या नावाने साजरा होतो. संक्रांतीच्या नंतर येणाऱ्या दिवसाला ‘किंक्रांत’ म्हणतात.

**<u>प्रथा आणि कारणे.</u>**

- **<u>आहार</u>** - संक्रांतीच्या दिवशी गुळाची पोळी आणि तिळगुळाचे विशेष महत्त्व असते. भोगीच्या दिवशी मात्र, या हवामानात उपलब्ध असणाऱ्या सर्व शेंगाभाज्या, फळभाज्या यांची तिळाचा कूट घालून केलेली मिश्र भाजी, तीळ लावलेली बाजरीची भाकरी, लोणी अणि मुगाची खिचडी असे पदार्थ आवर्जून केले जातात. हा काळ थंडीचा असतो. त्यामुळे अंगात उष्णता निर्माण होण्यासाठी तीळ खातात. तसेच बाजरीची भाकरी, लोणी, मुगाची खिचडी, वांगी, सोलाणे, पावटे, गाजर अशा इतर शक्तिवर्धक पदार्थांचा वापर जेवणात करतात.
- **काळ्या छटेचे कपडे** - संक्रांतीला बहुदा काळ्या छटेचे कपडे परिधान केले जातात. काळा रंग उष्णता शोषून घेतो आणि बोचऱ्या थंडी पासून संरक्षण करतो.



- **तिळगुळ घ्या गोड बोला** - तीळ वापरण्यातला दुसरा अर्थ सिग्धता. स्निग्धता म्हणजे स्नेह-मैत्री या स्नेहाचे गुळाशी मिश्रण करतात. स्नेहाची गोडी वाढावी हा त्यातला हेतू. तेव्हा या दिवशी या तिळगुळाची देवाण घेवाण करायची, स्नेह वाढवायचा, नवीन स्नेहसंबंध जोडायचे. जुने असलेले समृद्ध करायचे, तुटलेले आवर्जून पूर्ववत करायचे हा हेतू असतो.

**हळदी कुंकू** - संक्रांतीची संध्याकाळ झाली की छानशा नटलेल्या सजलेल्या महिलांचा, आप्तस्वकियांचा ओघ घरी सुरू होतो. गरम वाफाळत्या मसाला दुधाचा आस्वाद घेत, गप्पा-टप्पा होतात. हळदीकुंकू लावून तिळगुळ आणि वाण ओटीत घातली जातात. वाण किंवा लूट नुसते निमित्त असते, पण त्या निमित्ताने भेटी-गाठी होतात, माहितीची देवाणघेवाण होते आणि एकूणच धम्माल येते. घर हास्य विनोदाने आनंदाने भरुन जाते.



- **तिळवण** - विवाहानंतरच्या प्रथम संक्रांतीला, नवविवाहित वधूचे हळदीकुंकू करण्याची प्रथा आहे. तिला यासाठी काळ्या साडीची भेट दिली जाते. हलव्याचे दागिने मुलीला व जावयालाही देऊन त्यांचे कौतुक केले जाते. तसेही, मुलीचे आणि जावयाचे कौतुक करायला आम्हा मराठी लोकांना कोणतेही कारण चालते.
- **बोरनहाणं** - लहान बालकांनाही संक्रांतीनिमित्त काळ्या रंगाचे कपडे घालणे व त्यांना हलव्याचे दागिने घालणे अश्या पद्धती दिसून येतात. चुरमुरे, बोरे, हरभरे, उसाचे तुकडे, हलवा असे मिश्रण लहान मुलांच्या डोक्यावर ओततात. अलीकडे यामधे गोळ्या, छोटी बिस्किटे घालण्याची हौसही दिसते. याला बोरनहाणं अथवा लूट असे म्हणतात. बालकांच्या वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत बोरनहाणं केले जाते.




- **सुगड आणि वाण** - भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण एकमेकांना स्त्रिया देतात. हरभरे, ऊस, बोरे, गव्हाची ओंबी, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात.
- **पतंग** - संक्रांत या उत्सवास पतंग महोत्सव म्हणुनही ओळखले जाते. या दिवशी छोट्या मुलांपासून मोठ्यापर्यंत पतंग उडवतात. पतंग उडवण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे काही तास सुर्यप्रकाशात घालवणे जे आरोग्यासाठी लाभदायक ठरते.



**<u>काळानुसार बदल</u>.**

- वर्षानुवर्षे सुरु असणा-या या परंपरेमागे स्त्रियांनी एकत्र येण्याचा सामाजिक उद्देश दिसून येतो. पुर्वीच्या स्त्री वर्गाची परिस्थिती पाहाता धार्मिक कारण असल्याशिवाय स्त्रियांना घराबाहेर पडण्यास मुभा नव्हती. त्यामुळे, हळदी कुंकवानिमित्त एकमेकांच्या घरी जाण्याने वाढणारा सलोखा उपयुक्त ठरला. नव्या काळात आता महिलांना घराबाहेर पडण्यास जरी निर्बंध नसले तरी, संक्रांतीच्या निमित्ताने नवीन कपडे, दागिन्यांची खरेदी, सजणे धजने, माहेरी जाणे, मित्र मैत्रिणी आणि आप्तेष्टाना भेटणे, तिळगुळ, गुळपोळी आणि नवीन गोड पदार्थ खाणे अशी कित्येक आर्थिक, सांस्कृतिक, मानसिक आणि ऐच्छिक कारणे ह्या सणाला जिवंत ठेऊन आहेत.

- पूर्वीच्या काळी फळे आणि शेतीतून पिकणाऱ्या गोष्टी वाणातून दिल्या जायच्या. आता तयार मसाले, गृहउपयोगी वस्तू, हळदी कुंकवाचे पॅकेट्स ते सहज वापरता येण्यासारखे गिफ्ट कार्ड्स अशा भेटवस्तू वाणातून दिल्या जातात. जे तुम्ही देणार ते उपयुक्त ठरेल, वापरले जाईल आणि पर्यावरणपुरक असेल असे वाण निवडण्याकडे कल दिसून येतो आहे.

**<u>मजेदार माहिती.</u>**

- ✓ मकरसंक्रांत दर काही वर्षांनी एकएक दिवस पुढे जाते आहे. उदाहरणार्थ - १९२५ साली मकरसंक्रांत १३ जानेवारी ला होती, २०२० साली १५ जानेवारी ला, २१५० साली १६ जानेवारी, २२०० साली १७ जानेवारी आणि २६०० पर्यंत ती २३ जानेवारी ला साजरी होईल. (अर्थातच, आपल्या पुढ्याच्या पिढ्या ही प्रथा जिवंत ठेवतील अशी आशा करून).
- ✓ महाराष्ट्र शिवाय हा सण भारताच्या विविध प्रांतांत, आणि भारताबाहेर बऱ्याच देशात उत्साहाने साजरा केला जातो. महाराष्ट्र बाहेर मात्र ह्या सणाला वेगळ्या नावाने ओळखतात. कर्नाटक, आंध्र प्रदेश - संक्रांति, तमिळनाडू - पोंगल, उतर भारतात हिमाचल प्रदेश - लोहडी अथवा लोहळी, पंजाब - लोहडी अथवा लोहरी, पूर्व भारतात बिहार - संक्रान्ति, आसाम - भोगाली बिहू, पश्चिम बंगाल - मकर संक्रान्ति, ओरिसा - मकर संक्रान्ति, नेपाळ - थारू लोक माघी, थायलंड - सोंग्क्रान, लाओस - पि मा लाओ, म्यानमार - थिंगयान.
- ✓ उत्तरायण (winter solstice) आणि दक्षिणयान (summer solstice) असे वर्षाचे दोन भाग आहेत. मकरसंक्रांत या दिवसापासून सूर्य उत्तरायण होते. उत्तरायण म्हणजे त्या काळापासून पृथ्वीच्या उत्तर गोलार्ध सूर्याकडे वळतो, त्यानंतर सूर्य उत्तरेकडून निघू लागतो. त्याला सोमयान असेही म्हणतात. उत्तरायण हा मकरसंक्रांती ते कर्कसंक्रांती दरम्यानचा सहा महिन्यांचा कालावधी आहे.
- ✓ महाभारतात कुरु वंशाचे संरक्षक भीष्म हे बाणांच्या शय्येवर (शरशय्येवर) उत्तरायणाची वाट पहात पडून होते. त्यांना इच्छामरणाचे वरदान होते. ज्या दिवशी उत्तरायण सुरू झाले त्यादिवशी त्यांनी प्राणत्याग केला. भारतीय परंपरेत उत्तरायणाचा काळ दक्षिणायनापेक्षा अधिक शुभ मानला जातो.
- ✓ संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते अशी समजूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते. मात्र यामागे नेमका काय कार्य-कारणभाव आहे हे मात्र नोंदविलेले दिसून येत नाही.

लेखक - आनंद मोरे.

(संदर्भ - विकिपीडिया, वृत्तपत्रे आणि इतर)

**तिळाचे लाडू / वड्या**

**साहित्य:**

४ कप भाजलेले तीळ

३ कप चिकीचा गूळ

१ कप सुके खोबरे ( किसून व भाजून घेतलेले )

१ कप दाण्याचा जाडसर कूट

१/२ टीस्पून वेलदोडा पूड

१/२ टीस्पून तूप हाताला लावण्याकरिता

२-३ टेबलस्पून पाणी पाका करिता

**कृती:**

१. गूळ बारीक चिरून घ्या व ३ टेबलस्पून पाणी घालून पाक करा

२. पाक तयार झाला की तीळ, खोबरे, दाण्याचा कूट व वेलदोड्याची पूड, हे सर्व पाकात घाला. हे मिश्रण एकत्र ढवळून घ्या.

३. मिश्रण गरम असेपर्यंतच लाडू वळा. हाताला तूप लावल्याने सोप जाते.

* या मापाचे साधारण ३०-४० लाडू होतात.

वड्या करायला हेच मिश्रण तूप लावलेल्या थाळीवर पसरा. याच्या हलक्या व खुसखुशीत वड्या मस्त होतात.

**सौ. इला कुलकर्णी**

## स्वयंपाक घरातील टिप्स :-

१. बटर चे तूप कढवताना, बटर गरम झाल्यावर २-३ चमचे लिंबू रस घालावा, तूप कणीदार होते.

२. तूप कढवताना २-३ लवंग घातल्यास तूप कितीही जुने झाले तरी त्याला जुनाट वास येत नाही.

३. सामोसा च्या पारीचे पीठ मळताना पिठामध्ये मोहनासोबत फ्रिज मधले थंड पाणी वापरावे, सामोसे कुरकुरीत होतात.

४. महिन्यातून एकदा मिक्सर च्या भांड्यातून मीठ फिरवावे, मिक्सर च्या भांड्यांच्या पातीची धार कायम राहते.

५. भेंडीची भाजी करण्यापूर्वी भेंडी चिरून फ्रिज मध्ये ठेवल्यास भाजी चिकट होत नाही.

६. थंडीमध्ये इडली पीठ उबत नाही, पीठ उबण्यासाठी पिठामध्ये १-२ ब्रेड चे तुकडे मिक्सर मधून काढून घालावे, पीठ छान उबते.

७. रस्सा भाजी करण्यासाठी तेलावर १ चमचा बेसन पीठ परतावे, भाजीला घट्टपणा येतो.

८. कोणतीही पालेभाजी करताना सुरवातीला तेलावर मीठ टाकावे, भाजीला छान तुपाची चव येते.

९. तीळ भाजताना त्यावर पाणी शिंपडावे आणि ते पाणी पूर्ण वाळेपर्यंत भाजावे, तीळ एकसारखे भाजले जातात.

१०. कोणत्याही भाजीमध्ये मीठ जास्त पडल्यास त्यात कणकेचा गोळा टाकावा आणि १० मिनिटाने काढावा, मिठाचे प्रमाण बरोबर होते.

**- गौरी कुलकर्णी**


**ज्योती मध्ये जाहिरातीचे दर:**

अर्धे पान : $५०          पूर्ण पान : $१००

ज्योती अंका साठी साहित्य / मजकूर पाठविण्याचा पत्ता:

jyoti@neomm.org

# विंटर RV ट्रिप

'तू गम्मत करते आहेस नं?' मी स्नेहिताला म्हणालो. अरे जेव्हा थंडी आणि virus मुळे लोकं घरात आहेत तेव्हा आपण बाहेर जायचं??

सत्यवचन: उन्हाळ्यात सगळे आऊटडोअर ट्रिप्स करतात. पण २०२० मध्ये आपल्याला तेच नाही करता आलं. सो या unique प्रॉब्लेमचं unique solution म्हणजे winter RV ट्रिप. निसर्गाच्या जवळ पण लोकांपासून दूर. डिसेम्बर चा शेवट/ख्रिसमस ला कोणीच बाहेर नसतं त्यामुळे तेव्हाच बाहेर जायचं. ठरलं तर मग. ॲडव्हेंचर इज ON.

हा आहे एका विंटर RV ट्रिप चा अनुभव.....



ट्रिप म्हटलं कि तयारी आलीच.. त्यात हि RV ट्रिप.. आणि त्यातही विंटर RV ट्रिप.. भरपूर तयारी लागते / प्लांनिंग लागतं. कधी जायचं? कुठे जायचं? काय न्यायचं? अँड सो ऑन.. चला उत्तरं शोधू .

कधी जायचं? जेव्हा फार लोक बाहेर नस्तील. विंटर आणि ख्रिसमस. Check.

कुठे जायचं? जिथे फार लोकं नस्तील. जिथे विंटर स्पोर्ट्स नस्तील. म्हणजे कमी लोकं. Check.

काय न्यायचं? खूप काही. Overprepared ईज better prepared. Check.

हे सगळं कन्सीडर करून आम्ही हॉकिंग हिल्स कॅम्प ग्राउंड निवडलं. किंवा Google वर 'RV camping near me' हे शोधलं तरी पर्याय मिळतील.

RV बुक करण्या आधी जागा बुक केली पाहिजे. बुक करतांना full hookup सिलेक्ट केलं तर इलेक्ट्रिक कनेक्शन, पाणी लाईन आणि वेस्ट डिस्पोजल सगळं जागीच मिळतं. सोबत वेगळा पिकनिक टेबल आणि कॅम्प फायर ची जागा. BOOKED. एकदा हे बुकिंग झालं की उत्कंठा वाढते. पुढचा टप्पा RV बुकिंग.

चांगली आणि माफक दरात RV पाहिजे म्हणून RVSHARE.COM ला गेलो. तुम्हाला किती मोठी, किती नवी, किती लोकांसाठी आणि किती बजेट मध्ये RV हवी, तसे पर्याय इथे मिळतात. RV (Recreational

Vehicle) म्हणजे चाकांवर घर. पूर्ण किचन, सोफा, बेड्स, टेबल, पाण्याची टाकी.... आणि सामान ठेवायला भरपूर जागा. आम्ही २००८ ची ६ लोकांसाठी RV निवडली. BOOKED.



आणि आता सगळ्यात महत्वाचा प्रश्न: काय न्यायचं?

RV ट्रिप ची भरपूर मजा घ्यायची असेल तर ट्रिप मध्ये कमीत कमी काम ठेवा. खायच्या गोष्टी मध्ये विविधता ठेवा आणि ५ वर्षाच्या विद्यार्थ्याला ला जसा शाळेत डबा देतात तश्या खाण्याच्या गोष्टी घ्या. रेग्युलर काहीच नको. त्यात आम्ही खादाड म्हणून थोडं जास्त. खाऊ, चहा कॉफी चं सामान, मॅग्गी, फळं, चिवडा, पॅनकेक मिक्स (पॅनकेक करायला सोपे आणि बाहेर स्नो असतांना गरम पॅनकेक वर मॅपल सिरप आणि ब्ल्यूबेरी म्हणजे नुस्ता माहोल), सँडविच चं सामान, एखादा भात. सोबत आपले ब्लँकेट, चादरी, प्यायचं पाणी, गरम कपडे, टॉर्च, औषधं..... प्लांनिंग कंप्लिट.



आणि तो दिवस आला. RV पिकउप करायचा. RV ओनर नि सगळं समजावून सांगितलं. इलेक्ट्रिक / पाणी कनेक्शन, बॅकअप जनरेटर, वॉटर हीटर, प्रोपेन टँक, फायर वूड, TV, स्लाईड आऊट... ३० मिन मध्ये खूप माहिती. स्नेहीता नि विडिओ केला जो नंतर खूप कामी आला.

घरी येऊन सामान भरलं. पाण्याची टाकी ४० गॅलन भरून घेतली. ओजस एकदम खुश होता. त्यांनी आपली जागा सेट केली. आम्ही कोलंबस हुन मित्रा ला घेऊन कॅम्पग्राऊंड ला पोचलो. बाहेर २२ F होतं.

कॅम्पग्राऊंड मध्ये १५० RV साईट्स होत्या पण फक्त ४ RV होत्या. कॅम्पसाईट पार्क च्या एकदम आत. क्रिसमस मुळे ऑफिस बंद. ऍडव्हेंचर सुरु.



इलेक्ट्रिक कनेक्शन लावलं आणि लक्षात आलं कि पाणी कनेक्शन बंद आहे. थंडी मध्ये पाईप्स फुटू नयेत म्हणून कनेक्शन बंद होते. पूर्ण कॅम्प चे. आता काय करायचं? जे ४० गॅलन पाणी भरून आणलं होतं ते फार महत्वाचं झालं.

बाहेर स्वच्छ स्नो पडला होता. थोडा प्रकाश होता. मित्रा च्या मदतीनं इलेक्ट्रिक कनेक्शन जोडलं आणि मस्त आलं टाकून चहा बनवला. आणि आयडिया आली. बाहेर चहा घेतला तर? लगेच तयार होऊन सगळे बाहेर आलो आणि स्नो मध्ये फिरत चहा घेतला. मज्जा. टोन सेट झाला. नेक्स्ट इज कॅम्पफायर. आणि ट्रिप सुरु झाली...



एकदा थंडी एन्जॉय केली आणि त्याची चटक लागली. कॉफी ला बाहेर, कॅम्पफायर ला बाहेर, स्नो वॉकला बाहेर, फोटो साठी बाहेर, साईट सिईंग साठी बाहेर, प्लेग्राऊंड साठी बाहेर, 'रोज लेक' बघायला बाहेर, आणि हो ऑकेजनली कॉमन टॉयलेट बाथरूम वापरायला बाहेर (फार कमी लोकं असल्यामुळें कॉमन एरिया प्रायव्हेट झाले होते).... आत कमी आणि बाहेर जास्त.. असं झालं. आणि आत असतांना गप्पा, किस्से, पत्ते, स्पॉट-इट आणि बरंच काही. आणि हो, स्नो मध्ये फोटोग्राफी अप्रतिम होते. याचा अनुभव आला.

आमची तयारी चांगली असल्यामुळें धिस ॲडव्हेंचर बिकेम फन. विंटर RV ट्रिप इतकी फन असू शकते हे ठाऊक नव्हतं. ३ दिवस कसे गेले कळलंच नाही. परत येतांना कोलंबस मधून बिर्यानी घेतली. परत जाण्याची इच्छा कोणाचीच नव्हती. एक बकेट-लिस्ट म्हणून सुरु झालेली गोष्टं, लाइफटाइम मेमरी बनली. आज पण प्रत्येक आठवण फ्रेश आहे. प्रत्येक फोटो बोलका आहे. आणि ... पुन्हा जायची इच्छा आहे.

तुम्ही जाल? नक्की जा. NJOY!! **- हर्षल बरिदे**

# सांख्य-कारिका Quantified Philosophy

## कपिल मुनि Sage Kapil

### ७०००-५५०० इसवी सन पूर्व 7000-5500 BCE

अश्वत्थ: सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारद: |

गन्धर्वाणां चित्ररथ: सिद्धानां कपिलो मुनि: ||१०.२६||

- श्रीकृष्ण, भगवद गीता, ५५०० इसवी सन पूर्व

Amongst trees I am the peepul tree (*sacred fig tree*); of the celestial sages I am Narad (*a god-sage, famous in Hindu traditions as a traveling musician and storyteller, who carries news and enlightening wisdom.*). Amongst the Gandharvas (*male nature spirits and husbands of the Apsaras. They have superb musical skills.*) I am Chitrarath, and **amongst the *siddhas*** *(those who have attained perfect intellect)* **I am the sage Kapil.** ||10.26||

- Shri Krishna, Bhagwad Gita, 5500 BCE

माझा स्वतःचा सांख्य परिचय *My own introduction to Sankhya-karika* (Quantified philosophy)

## प्रस्तावना Prologue

ऑक्टोबर २०१८ च्या महिन्यात एक दिवशी मी आयुर्वेद या विषयावर सर्च करत होतो. सर्च रिझल्ट्स् मधे मला एक सांख्य फिलॉसॉफी नावाचे नंदलाल मिश्रा यांनी १९१५ साली अनुवादित केलेले एक पुस्तक मिळाले व त्याचबरोबर विकी-पीडीया वर कपिल मुनी आणि सांख्य-कारिका बद्दल माहिती मिळाली.

१०० हून अधिक वर्षांपुर्वीचे अनुवादित पुस्तक व ७००० वर्षांपुर्वीची कपिल मुनींनी लिहीलेली फिलॉसॉफी बघुन मला हे काय आहे हे माहिती करुन घ्यायची उत्सुक्ता लागली व माझे वाचन चालू झाले. सांख्य-कारिका (७२ श्लोक) म्हणजे विश्वाची निर्मिती, जीव निर्मिती व त्याची कारणे यांचे सत्यापित सत्य व अनुमान वापरुन केलेले स्पष्टीकरण (किंवा भाष्य)

७२ श्लोकात इतक्या सहज व सरळपणे केलेले भाष्य नकळतच माझ्या दैनंदीनीच्या विचारांचा एक पाया बनला. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांच्याच गंभीर विचार (क्रिटीकल थिंकींग) चा हा एक सुंदर भाग

असावा अस मला मनापासून वाटत आणि म्हणूनच सांख्य फिलॉसॉफी माझे स्वतःचे विचार न जोडता पण थोड्या आधुनिक स्वरूपात आणि आधुनिक भाषेत सांगण्याचा माझा एक प्रामाणिक प्रयत्न.

One morning in October 2018 I was looking for some information on Ayurveda. While searching I came across a book called The Sankhya Philosophy, translated by Nandalal Misra, 1915. Along with this search also came a wikipedia result on Kapil muni (sage) and his work - Sankhya-karika.

The date of translation going back to 1915 churned up my curiosity, but learning that Kapil muni authored this philosophy more than 7000 BCE ago set me off on my journey of Sankhya. Sankhya philosophy is a simple and logical of rendering of how this world came into existence, how life came into existence and what is the purpose of our existence. Before I knew it it became part of my own critical thinking.

If Sankhya becomes a part of youth-to-adult critical thinking, it will only elevate one positively. Hence my humble attempt to let it just flow through me as-is without any of my own injections other than modern formatting and may be a bit modern language. I am intentionally writing this in English/Marathi so our young Marathi generation can read it as well.

## दुःखत्रयाभिघातात् जिज्ञासा तदवघातके हेतौ ।
## दृष्टे सापार्था चेत्नैकान्तात्यन्ततोभावात् ||१||

दुःख त्रय अभिघातात् जिज्ञासा तत अवघातके हेतौ । दृष्टे सा अप-अर्था चेत् न एकान्त-अत्यंत-तः-अभावात् ।

दुःख - sorrow

त्रय - three

अभिघातात् - disagreeable occurrence

जिज्ञासा - desire to know

तत - that

अवघातके - preventive / counter-active thereof

हेतौ - objective

दृष्टे - visible, known

सा - it

अप-अर्था - purpose-less/superfluous

चेत् - if it is said

न - no

एकान्त-अत्यंत-तः-अभावात् - permanency-absolute-lack of certainty

दुःख तीन प्रकारची असतात. अशा अनिष्ट दुःखांवर मात कशी करायची? माहितीतले उपाय काही संपुर्ण, कायमचे, आणि खात्रीलायक नाहीत.

Sorrows are of three types. How do we overcome the undesirable occurrences of sorrows? All known solutions are neither permanent, absolute or certain (guaranteed to work).

## दृष्टवदानुश्रविकः सह्यविशुद्धिक्षयातिशययुक्तः ।
## तद्विपरितः श्रेयान् व्यक्ताव्यक्तज्ञविज्ञानात ||२||

दृष्टवत् आनुश्रविकः सः हि अविशुद्धि क्षय अतिशय युक्तः । तत विपरितः श्रेयान् व्यक्त अव्यक्त ज्ञ विज्ञानात ।

दृष्टवत् - like the ordinary
आनुश्रविकः - the revealed, Vedic, scriptural
सः - it
हि - for
अविशुद्धि - impurity
क्षय - waste
अतिशय - excess
युक्तः - filled with
तत - thereof
विपरितः - opposite
श्रेयान् - preferable
व्यक्त - manifest
अव्यक्त - unmanifest
ज्ञ - knower
विज्ञानात - in knowledge of

सामान्य उपायांप्रमाणे पारंपारिक उपाय देखिल अशुद्ध, अपरिणामकारक, आणि अतिरेकाने भरलेले आहेत. त्यापेक्षा उत्तम उपाय म्हणजे व्यक्त, अव्यक्त आणि अनुभवणारा (Knower) यांच ज्ञान.

Like the ordinary, is the scriptural means for it is filled with impurity, waste and excess. The opposite of both is preferable, as it consists in the discriminative knowledge of the Manifest, the Unmanifest, and the Knower.

मूलप्रकृतिरविकृतिर्महदाद्याः प्रकृतिविकृतयः सप्त।
षोडशकस्तु विकारः न प्रकृतिर्न विकृतिः पुरुषः||३||

मूल प्रकृतिः अविकृतिः महत आद्याः प्रकृति विकृतयः सप्त।षोडशकः तु विकारः न प्रकृतिः न विकृतिः पुरुषः।

मूल - root
प्रकृतिः - evolvent (that evolves)
अविकृतिः - non-evolute (it is not a product)
महत - Mahat
आद्याः - etc
प्रकृति - evolvent
विकृतयः - evolute (product)
सप्त - seven
षोडशकः - 16
तु - merely
विकारः - evolute
न प्रकृतिः - not evolvent
न विकृतिः - not evolute
पुरुषः - Purush

मुळ-प्रकृति ही अविकृत आहे (कशा पासून बनलेली नाही). महत इत्यादी हे सात प्रकृति-विकृति आहेत. सोळा केवळ विकृति आहेत. पुरुष प्रकृति पण नाही आणि विकृति पण नाही.
The Root-Evolvent is no evolute. Mahat, etc, are the seven evolvent-evolutes. The sixteen are mere evolutes. That which is neither evolvent nor evolute is Purush.



संदीप दीक्षित. क्लिव्हलँड. ओहायो

**लेखकाबद्दल** (About the Author)

एक अभियंता आणि एक तत्वज्ञ. An engineer and a philosopher.




**॥ मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा ॥**

*- Sunny's Asian Foods and Spices, Solon*

***Website:*** www.sunnysasianfood.wordpress.com

*Phone:* (440) 248-0801





**॥ मकरसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा ॥**

*Parivar Spice Mart, Mayfield Height*


Phone: (440)-771-4484

Rating: 4.5/5 ☆


## ओरिगामी - घर




१. एक चौकोनी पेपर घ्या.




२. वरून खाली मध्यावर घडी घाला.




३. फोल्ड केलेल्या पेपर ला मध्यावर घडी घाला व परत उलगडा.




४. दोन्ही बाजू मध्ये फोल्ड करून घ्या आणि परत उलगडा.



५. दोन्ही कोपऱ्यात दाखल्या प्रमाणे घडी घालून परत उलगडा.



६. पेपर थोडा उलगडून एक कोपरा घडी वर दुमडा.



७. दुसरा कोपरा मागच्या पायरी प्रमाणे फोल्ड करून घ्या. तुमचे घर तयार.




८. घराला दार आणि खिडक्या पेन्सिल किंवा पेन ने काढा.

**youtube व्हिडिओ**

https://youtu.be/1mtuhq78is4

**जितेश रडे**, आपला बाल कलाकार





## 2021 ईशान्य ओहिओ  मराठी मंडळ परिवार



**संध्या अशोक देशपांडे**

महाराष्ट्रापासून हजारो मैल दूर, मराठी लोकांनी मराठी लोकांकरता चालवलेले आपले ईशान्य ओहायो मराठी मंडळ, यंदा ४६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. गेली ३० वर्षे मंडळाशी संलग्न होतेच, या वर्षी चिटणीसपद (Secretary)संभाळते आहे. लोभ असावा🙏

**गीता लिमये**

नमस्कार!
मी ईशान्य ओहायो मराठी मंडळाची १९९७ पासून सदस्य आहे. गेली अनेक वर्षे आपल्या मंडळाच्या स्थानिक कलाकारां बरोबर नाटक, नाटिका आणि संगीत कार्यक्रमां मधून सहभागी होताना खूप आनंद मिळाला. मी ह्या वर्षीच्या कार्यकारिणीत ‘सांस्कृतिक कार्यवाह’  म्हणून काम करण्यास खूप उत्सुक आहे.





**अमृत पत्की**

१६००० मैलाच्या अंतरावर पुन्हा महाराष्ट्र आणि मराठी माणसं मिळणं हा काही योगायोग नाही. हे आहेत तुमचे आमचे प्रयत्न , प्रेम आणि आदर. या प्रयत्नांची पुर्तता म्हणजे आपले मराठी मंडळ (ईशान्य ओहायो मराठी मंडळ)
यावर्षीच्या कार्यकारणीवर काम करण्याची तुम्ही मला जी संधी दिली आहे, त्यासाठी धन्यवाद! चला सगळेजण मिळून नवीन वर्ष रुचकर बनवूया.

**क्षितिजा भोरकर**

ईशान्य ओहायो प्रदेशातील मराठी समुदायासाठी NEOMM एक उत्तम व्यासपीठ आहे जिथे या प्रदेशातील मराठी जनता आपली भाषा आणि संस्कृती टिकवण्यासाठी संवाद साधण्यासाठी  सहयोग आणि सहभागी होऊ शकते.





नमस्कार NEOMM मंडळी,
मी, **विश्वेशा देशपांडे** NEOMM स्वयंसेवक .
माझी २०१९ मध्ये प्रथम मंडळाशी ओळख झाली, तेव्हापासून मी मंडळाशी जोडले गेले. या मंडळातील सर्जनशील कार्यक्रम आणि उत्साही कार्यकर्ते  यांनी मला प्रेरणा दिली मंडळाशी जोडून रहाण्याची.
धन्यवाद.

## 2021 ईशान्य ओहिओ  मराठी मंडळ परिवार



### अभिजित कुरणे

ईशान्य ओहायो मराठी मंडळाचा खूप खूप आभारी आहे ज्यामुळे आपले सगळे सण उत्साहात साजरे करायला मिळतात आणि त्यांची माहिती व ओळख आपल्या मुलांना चांगल्याप्रकारे करून देता येते.तसेच खूप चांगला मित्र-परिवार मिळाला. असेच नव-नवीन उपक्रम राबवा आणि खूप खूप शुभेच्छ्या.

### हर्षल बरिदे



नवीन वर्षी अजून उजळू मराठी नाती गोती
चला सारे तेवत ठेऊ NEOMM ची हि ज्योती



### स्वाती साठे

मी १५ वर्षांहून अधिक काळ NEOMM ची आजीव  सदस्य आहे आणि या अतिशय मैत्रीपूर्ण गटा बरोबर कार्य करण्यास मी खूप उत्सुक  आहे!

### रितू चक्करवार



मराठी सांस्कृतिक मेळावा



### पल्लवी चव्हाण

Neomm माझ्यासाठी जिव्हाळा, आपुलकी आणि सहकार्य असलेले कुटुंब आहे.




**इला कुलकर्णी**

10 वर्षे क्लीव्हलँड रहिवासी आणि NEOMM समुदायाची सक्रिय सदस्य. मी मराठी मंडळाच्या माध्यमातून मराठी संस्कृती आणि परंपरा पुढे चालविण्यास उत्सुक आहे.

**विवेक विन्हेरकर, युवा सचिव**



मराठी परिवाराला एकत्र आणल्याबद्दल NEOMM चे आभार



**अनुजा मोरे**

आपलं मराठी मंडळ म्हणजे घरापासून दूर असलेले आमचं कुटुंबच आहे. इथे माझे भाऊ आहेत, तशाच बहिणी आणि  वाहिनी पण आहेत, काका, मावश्या, आजी, आजोबा आणि झालेच तर कित्येक भाच्या आणि भाचे पण आहेत. ह्या आमच्या मराठी कुटुंबामुळे, आम्ही इथे परक्या देशात राहतोय असे वाटतच नाही. किती आभार मानावे तेवढे थोडेच.

## ॥ धन्यवाद ॥